Pune Municipal Corporation

# पुणे महानगरपालिका

## (कमेन्समेन्ट सर्टिफिकेट)

कार्यकारी अभियंता कार्यालय,
बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे – ४११००५.

(यापुढील पत्रव्यवहार खालील [illegible] उल्लेखासह करावा)
(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी [illegible] सदरास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)
(अदा केलेल्या [illegible]पासून एक वर्ष[illegible])

जमीन ले आऊट (रेखांकन / भू आ[illegible] / एकत्रीकरण / वि[illegible] दाखला (संमती नकाशासह)

प्रकरण क्रमांक DNE/0039/12
Proposal Type : Residential
Case Type : New
Project Type : Amalgamation + Proposed Building

क्रमांक CC/0896/16
दिनांक 11/7/2016

श्री. / श्रीमती MUKESH P GADA (PAH) द्वारा ला.स.श्री. SIDDHARTH S HARISCHANDRAKAR (CA/2004/34707) यांस
राहणार पुणे, पेठ OFFICE NO-70,71,72, 4TH FLOOR PATIL ARCADE,KHILARE ROAD,ERANDAVANA,PUNE महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ चे कलमे ४४/४५/५८/६९ व मुंबई प्रांतिक [illegible] महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ चे कलमे २५३/२५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सीमेतील पेठ DHANORI-EXT घरांक सर्व्हे नं. 29 सि.स.नं. - हिस्सा नं. S NO 29(P) & 67/1B(P) फायनल प्लॉट क्र. - प्लॉट क्र. - (-)
(सोसायटी) येथे विकास करण्यासाठी आपण महानगरपालिकेकडे दिनांक 11/12/2012 रोजी [illegible]

उपरोक्त विकास प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार विकास सुरू करण्याचा दाखला/संमतीपत्र खालील अटींवर देण्यात येत आहे. (सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजणेत यावा.)

अटी :-

१. सदर प्रस्तावातील दर्शविण्यात आलेली दर्शनी अंतरे/रस्ता प्रमाण रेषा पर्यंतचे क्षेत्र पुणे म.न.पा.च्या सुचनेनुसार भविष्यात सार्वजनिक रस्त्याचा भाग राहणार आहे.
२. कोणत्याही नवीन इमारतीचा अथवा वाढीव/दुरुस्त इमारतीचा वापर अथवा वापरासाठी परवानगी वा ताबा हा कोणत्याही व्यक्तिद्वारे पुणे म.न.पा.च्या भोगवटापत्र प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.
३. सदर संमतीपत्राची/विकास परवानगीची मुदत (काम सुरू झालेले नसल्यास) संमतीपत्राचे दिनांकापासून १ वर्षाची राहील. (सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजणेत येईल.)
४. सदर संमतीपत्र हे मुदत संपल्यानंतर प्रत्येक वर्षी नुतनीकरण करणे आवश्यक आहे असे नुतनीकरण सलग तीन वेळा करता येईल. तसे न झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये नवीन अर्ज करून संमती घ्यावी लागेल. एम.आर.टी.पी. कलम ४८ अन्वये संमतीपत्राची वैधता राहील.
५. सदरचे संमतीपत्र हे पुढील अटींचा भंग झाल्यास रद्द करण्यास पात्र राहील.
(अ) जागेवरील विकसन/बांधकाम हे मान्य नकाशाप्रमाणे दर्शविलेल्या/संमत केलेल्या वापरानुसार होत नसल्यास अथवा सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम/अनधिकृत वापर चालू असल्यास अटींचा भंग समजण्यात येईल.
(आ) सदर बांधकाम प्रस्तावातील संदर्भातील नमुद केलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यास / झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.
(इ) अर्जदाराने सदरची परवानगी ही गैर कृत्य करून पुणे म.न.पा. चे दिशाभूल करून प्राप्त केलेली आहे असे निदर्शनास आल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल. विकास नियंत्रण नियमावली नियम क्र. ६.१४, महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट कलम २५८ अन्वये सदरची परवानगी दिशाभुल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.
(ई) अर्जदार आणि जो इसम हा स्वत: किंवा त्याच्याद्वारे मालकी हक्काचा दावा करून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४२ व ४५ अन्वये असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून जमीन विकसन अथवा बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरची परवानगी दिशाभुल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.
६. सदर संमतीपत्रावरील/यात असलेल्या अटी व सुचना या केवळ अर्जदारास नव्हे तर भविष्यातील अर्जदाराचे सर्व वालीवारस, मुखत्यारपत्रक, व्यवस्थापक, प्रशासक, वारसदार आणि प्रत्येक इसम जो अर्जदाराच्याद्वारा मालकी हक्क सिध्द करेल त्या सर्वांस कायमस्वरूपी बंधनकारक राहील.
७. काम सुरू करण्यापूर्वी एन. ए. ऑर्डर दाखल करणार.
८. अकृषिक दाखला (एन. ए. ऑर्डर), यु.एल.सी. आदेश, प्रदुषण नियामक मंडळाचे आदेशातील कामगार विमा आयुक्त यांचे अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
वरील संमतीप्रमाणे काम करताना महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होत आहे असे पुणे म.न.पा.चे निदर्शनास आल्यास सदरचे संमतीपत्र रद्द करण्याचा अधिकार पुणे म.न.पा.स राहील.
वरील संमतीपत्राविषयी काही शंका येत असेल तर कामास आरंभ करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.

| | | |
|---|---|---|
| इमारत निरीक्षक | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| बांधकाम विकास विभाग | बांधकाम विकास विभाग | बांधकाम विकास विभाग |
| पुणे म.न.पा. | पुणे म.न.पा. | पुणे म.न.पा. |

अटी पुढे चालू....

-:अटी :-

1 सदर रेखांकनास मा. महापालिका आयुक्त यांजकडून अंतिम मंजुरी घ्यावी अन्यथा रेखांकनातील कोणत्याही प्लॉटची विक्री किंवा लिज करता येणार नाही, तसेच रेखांकनातील कोणत्याही प्लॉटवर बांधकाम परवानगी दिली जाणार नाही.

2 १५ % ॲमिनिटी स्पेसचा एफ.एस.आय. सदर ॲमिनिटी स्पेस ताब्यात दिल्यानंतर व मालकी हक्काच्या उताऱ्यावर पुणे म.न.पा.ची नोंद झालेनंतर अनुज्ञेय राहील.

3 सदर मिळकतीतील कोणतेही भोगवटा पत्र मागणेपुर्वी वादग्रस्त क्षेत्रावरील बांधकामाचे अनुषंगाने सर्व बाबी निरस्त करणार, वादग्रस्त क्षेत्राबाबत कोणताही वाद निर्माण झालेस त्याची सर्वस्वी जबाबदारी मालक/विकसन कर्त्याची राहील. म.न.पा.स कोणताही तोशिष लागू देणार नाही.

4 यु.एल.सी.ऑर्डरमधील सर्व अटी संबंधित मालक /विकसकावर बंधनकारक राहतील त्यास पुणे म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

5 नैसर्गिक पाण्याचा दर्शविलेला प्रवाह नियमानुसार व सुचनेनुसार चॅनेलाईज करुन नैसर्गिक पाण्याचा प्रवाह बंदिस्त होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील. प्रत्यक्ष सर्वेक्षणानुसार आवश्यक ते चायनेलाशझेशन /नाला ट्रेन्चींग जागेवर प्रत्यक्षात करून घेणे बंधनकारक राहील.

6 एअर फोर्स ॲथॉरीटीचे १०० मीटर, ५०० मीटर, ९०० मीटर, ४.० कि.मी. मधील परिक्षेत्रातील व फनेल कक्षेबाबतचे सर्व निर्बंध बंधनकारक राहतील.

7 पावसाळी पाणी साठवणे व पुर्नवापरासाठी व्यवस्थापन करणे/रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे बंधनकारक राहतील.

8 ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा करणे करता स्वतंत्र व्यवस्था करणार.

9 पूर्व मान्य ले आऊट मधील सर्व अटी बंधनकारक राहतील.

10 मा.पर्यावरण विभागाकडील दि. १२ डिसेंबर २०१२ रोजीचे आदेशानुसार नमुद केलेप्रमाणे २०००० चौ.मी. पेक्षा जास्त [illegible] बांधकाम क्षेत्र नियोजन प्रस्तावास मा. केंद्र शासन यांचेकडील पर्यावरण विभागाकडील नाहरकत पत्र घेणे बंधनकारक [illegible] आवश्यक तेथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्डचे नाहरकत पत्र बांधकाम परवानगीचेवेळी दाखल करणे बंधनकारक राहील.

11 १५० पेक्षा जास्त टेनामेंट असल्यास ड्रेनेज विभागाचे नियम व सुचनेनुसार सिवेज ट्रीटमेंट प्लॅन्ट व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

12 नियमामधील तरतुदीनुसार नमूद केलेल्या विशिष्ट वापराकरिता सोलर वॉटर हिटरची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

13 नियमामधील तरतुदीनुसार नमूद केलेल्या विशिष्ट वापराकरिता सोलर वॉटर हिटरची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

14 पाणी पुरवठ्याबाबत दिलेले हमीपत्र बंधनकारक राहील तसेच दिलेल्या हमीपत्रातील बाबींसंदर्भात गाळेधारकाचे करारात नमूद करून गाळेधारकांना लेखी पूर्व कल्पना देणे, विकसन कर्त्यावर बंधनकारक राहील.

15 ले आऊट मधील ओपन स्पेस सर्व सभासदांसाठी खुली राहील दि.१४/०८/२००७ मधील तरतुदीनुसार रेनवॉटर हार्वेस्टिंग नियमानुसार ओपनस्पेस विकसित करणार.

16 बांधकाम परवानगी मागण्यापूर्वी पोहोच रस्ता विकसित करणार.

17 बांधकाम परवानगी घेतल्यापासून एक वर्षाच्या आतमध्ये एकत्रीत मोजणी नकाशा, एकत्रीत ७/१२ उतारा/स्वतंत्रपणे विभाजित मोजणी नकाशा, विभाजीत ७/१२ उतारा, बांधकाम विकास विभाग कार्यालयाकडे दाखल करणार.

18 रस्ता रुंदीचे अतिरिक्त चटई क्षेत्र वापरण्यापूर्वी सदरची रस्त्यात गेलेली जागा पुणे म.न.पा.च्या ताब्यात देणार.

19 जागेवर कोणतेही बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नियंत्रण विभाग पुणे म.न.पा. यांजकडून बांधकामाची परवानगी घेणार.

20 सदर रेखांकनामध्ये मिळकतीची विभागणी अथवा एकत्रीकरण केले असल्यास –अ. सर्व प्लॉट व सबप्लॉट यांचे नगरभूमापन अधिकारी अथवा जिल्हा निरीक्षक भुमीअभिलेख यांचेकडून मोजणी करून घेणार व प्रत्यक्षातील मापांनुसार दुरुस्त नकाशा सादर करणार. ब.प्रत्येक सब प्लॉटसाठी स्वतंत्र पाणीपुरवठा व मलनिःसारण व्यवस्था करणार.क. म.न.पा.कडून पाणीपुरवठा होईपर्यंत विकसकाने स्वतःसोय करावयाची आहे.ड. सदर मिळकतीच्या मालकीबाबत, त्याच्या क्षेत्राबाबत, मिळकतीच्या मापांबाबत प्लॉटस् व सब प्लॉटच्या पोहोच रस्त्याबाबत, अतिक्रमणाबाबत भविष्यात म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

21 सदर मिळकतीतून जाणारे विकास योजनेतील रस्ते हे गृहसंस्थेने / विकसकाने विकसन करावयाचे असून त्याची आखणी पुणे म.न.पा. कडून करून देण्यात येईल. या रस्त्यांची कॉलनी रस्ते म्हणून विकास करताना त्याची रुंदी वि.नि.नि.नुसार नियोजित करावी. कार्यकारी अभियंता (पथ) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार या रस्त्यांचा विकास करावयाचा असून त्याचे पुणे म.न.पा. कडे हस्तांतरण करावयाचे आहे. गृहसंस्थेने/विकसकाने स्वखर्चाने या रस्त्यावरील पाणीपुरवठा व मलनिःसारण वाहिन्यांचा विकास

करावयाचा असून म.न.पा. कडून त्याचा मोबदला मिळणार नाही. रेखांकनातील अंतर्गत रस्त्यांची रुंदी विकास नियंत्रण नियमावलीनुसार ठेवणार.

22 म.न.पा. कडून पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत, विकसक सर्व प्लॉटधारकांना/गाळेधारकांना त्याची जाणीव करून देणार.

23 गृहप्रकल्पामध्ये कोणत्याही इमारती भोवती कुंपण घालणार नाही, मात्र कोणताही विकास करण्यापूर्वी मिळकतीभोवती कायम स्वरूपी कुंपण घालणार.

24 गृहप्रकल्पामधील सर्व अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा वाहिन्या, मलनि:सारण वाहिन्या रस्त्याकडेची प्रकाश व्यवस्था इत्यादी गोष्टी विकसकाने स्वखर्चाने करावयाच्या असून त्याची भविष्यातील देखभाल दुरूस्तीची व्यवस्था विकसकाने करावयाची आहे.

25 यापूर्वी अदा करण्यात आलेले विकसनाचे दाखले/संमतीपत्रे रद्द समजण्यात यावीत.

26 विकास योजना विभागाकडून विकास योजनेमधील रस्त्यांचे प्रत्यक्ष जागेवर आखणी केल्यानंतरच कोणताही विकास सुरू करणार.

27 पुणे म.न.पा. कडून पाणीपुरवठा उपलब्ध होईपर्यंत विकसक/सहकारी संस्था स्वत:पाण्याची व्यवस्था करणार त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

28 रेखांकनातील सर्व प्लॉट व सब प्लॉट यांचे नगरभुमापन अधिकारी अथवा जिल्हा निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडून मोजणी करून घेणार व त्याचे मोजणी प्रमाणपत्र त्यांच्या मापांसह सादर करणार.

29 सदर रेखांकनात दर्शविलेल्या खुल्या जागांचे योग्य सपाटीकरण केल्यानंतर, त्यावर उद्यान विभागाकडील मार्गदर्शनानुसार वृक्षलागवड केल्यानंतर व त्याकडेने कुंपन घालणार.

30 कोणताही विकास सुरू करण्यापूर्वी नकाशात पिवळ्या रंगाने दर्शविलेली बांधकामे वैध मार्गाने पाडून घेणार.

31 उप अभियंता (विद्युत) यांच्याकडील तरतुदीनुसार सदर मिळकतीतील रस्त्यावर विद्युत प्रकाशासाठी खांब लावणार.

32 क्षेत्रिय कार्यालय/आरोग्य विभागाकडील तरतुदीनुसार सदर मिळकतीत कचरापेट्या ठेवणार.

33 उपअभियंता(मलनि:सारण) यांच्या सुचनेनुसार सेप्टिक टँकचे बांधकाम करणार व भविष्यात म.न.पा.च्या मलनि:सारण वाहिनीशी सदर मिळकतीतील सर्व मलनि:सारण वाहिन्या स्वखर्चाने जोडणार.

34 सदर मिळकतीतून जाणाऱ्या व नव्याने टाकावयाच्या मलनि:सारण वाहिन्या ह्या ड्रेनेज विभागाच्या देखरेखीखाली टाकणार.

35 सदर मिळकतीतून जाणाऱ्या व नव्याने टाकावयाच्या पाणी पुरवठा वाहिन्या ह्या पाणीपुरवठा विभागाच्या देखरेखीखाली टाकणार.

36 लेआऊटमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग व सरफेस ड्रेनेजची व्यवस्था करणार. रेखांकनामध्ये निर्देशित केलेले रस्ते यांचे बाजूने पावसाळी गटारे बांधणार.मा. कार्यकारी अभियंता (पथ) यांचे मार्गदर्शनानुसार सदर काम समाधनकारक व योग्य निकषानुसार करणार.

## काही महत्वाच्या विशेष सुचना

1 भविष्यात मान्य नकाशा व्यतिरिक्त कोणतेही बांधकाम (उदा. सर्व मार्जिनल अंतरात व टेरसवरील शेड, पार्टीशन वॉल करून अगर ग्रील लावून पार्किंग बंदिस्त करणे इ.) केल्यास, कोणतेही पूर्व सूचना न देता सदरची संपूर्ण अनाधिकृत बांधकामे पाडण्यात येतील व त्याप्रित्यर्थ येणारा संपूर्ण खर्च प्लॉट धारक/मालक यांचेकडून वसूल करण्यात येईल.

2 भूअभिन्यासातील अनुज्ञेय चटईक्षेत्र हे प्रस्तावित टी.डी.आर./रस्तारूंदी आरक्षित क्षेत्र/अॅमिनिटी स्पेसचे क्षेत्रासह दर्शविले आहे. प्रत्यक्षात या टी.डी.आर./रस्तारूंदी व अॅमिनिटी स्पेसच्या चटईक्षेत्राने मोबदल्या बांधकाम अनुज्ञेय करण्यात आलेले नाही. टी.डी.आर.सर्टीफिकेट उपलब्ध करून रितसर टी.डी.आर. खर्ची टाकल्यावरच व रस्तारूंदी/अॅमिनिटी स्पेस च आरक्षित क्षेत्रासाठी म.न.पा.चे नावे ७/१२ उतारा दाखल झाल्यावर त्या क्षेत्राचे बांधकाम अनुज्ञेय करण्यात येईल. तसेच भू अभिन्यासात चटईक्षेत्र मान्य केले, याचा अर्थ त्यांस बांधकाम परवानगी मिळाली असा होत नाही. केवळ भूअभिन्यास मान्य आहे, म्हणून त्या क्षेत्राचे बांधकाम केल्यास ते अनधिकृत समजून, एम.आर.टी.पी. १९६६, बी.पी.एम.सी. अॅक्ट १९४९ चे संबंधित कलमांतर्गत कारवाई करण्यात येईल. तसेच मिळकतीत त्रयस्थ हितसंबंध निर्माण झालेस, त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

3 एकत्रीकरण/विभाजन करून बांधकाम परवानगी घेतल्यास संमतीपत्र दिनांकापासून एक वर्षाचे आत एकत्रित/स्वतंत्र असा ७/१२ उतारा, मालमत्ता पत्रक तसेच मोजणी नकाशा महानगरपालिकेस सादर करणार.

4 ओला व सुका कचऱ्या करीता मिळकतीमध्ये कंटेनरची सोय करणार.

5 म.न.पा. पाणी पुरवठा उपलब्ध होईपर्यंत सर्व रहिवासांच्या पुरेसा पिण्याच्या पाण्याची अन्य व्यवस्था स्वखर्चाने करणार.

6 मिळकतीमधील रस्तारूंदीतील जागा पुणे म.न.पा.च्या ताब्यात देऊन म.न.पा.च्या नावे मालकी हक्काचे कागदपत्र झाल्यानंतरच चटईक्षेत्राचे नियोजन करणार व मोजणीचा नकाशा दाखल करणार.

7 इमारतीच्या आवारात कचरापेटी, दिवाबत्ती इ. बाबींची सोय करणार व पुरेशा संख्येत उद्यान विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लोखंडी ट्री गार्डमध्ये झाडे लावणार.

8 अस्तित्वातील वॉटर मिटर बाबत मिटर विभागाचे थकबाकी नसल्याबाबतचे ना हरकत पत्र दाखल करणार.

9 आवश्यक तेथे प्रोव्हीजनल फायर एन.ओ.सी. मधील अटी मालक/विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.

10 काम सुरू करण्यापूर्वी बांधकामास अडचळा येणाऱ्या झाडांबाबत गार्डन विभागाचे ना हरकत पत्र दाखल करणार.

11 बांधकामाचे नकाशांना परवानगी मिळाल्यावर विकसनकर्ता / मालक यांनी जागेवर फलक लावून खालील प्रमाणे माहिती दर्शवावी. क. मालकाचे, विकसकाचे, आर्किटेक्ट व कॉन्ट्रक्टर यांचे नावे व पत्ता.ख. जागेच्या हद्दीसह स.नं. सी.टी.एस. नंबर, वॉर्ड नंबर इ. ग. पुणे मनपाकडील विकसनासाठी /नकाशासाठी दिलेली परवानगी नंबर दिनांक.घ. बिल्टअप एरीया/नियोजीत बांधकामाचे एकूण क्षेत्र.ङ. निवासी फ्लॅटची संख्या, व्यापारी गाळ्यांची संख्या व त्यांचे क्षेत्र मान्य नकाशाच्या प्रती पाहण्यासाठी उपलब्ध असण्याचा पत्ता. छ. मान्य नकाशांची प्रमाणित प्रत बांधकामाच्या जागेवर उपलब्ध ठेवणे.

12 प्लॉटच्या आवारातील मोकळ्या जागेत व सामुहिक रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणार.

13 सदर इमारतीचे काम मुख्य रस्त्यालगत असल्यास चांगल्या प्रकारे किंवा पत्र्याचे पार्टीशन बसवून बंदिस्त करणार

14 बांधकामावर काम करणाऱ्या कामगारांसाठी त्यांचे संख्येनुसार तात्पुरती स्वच्छतागृहे उपलब्ध करू देणार स्त्री कामगारासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणार व ते कोणतेही भोगवटापत्र मागणेपूर्वी पाडणार.

15 बांधकामाच्या व पाडकामाच्या कालात तयार होणारा राडारोडा कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर अगर सार्वजनिक ठिकाणी टाकणार नाही व मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे मार्गदर्शनाने त्याची विल्हेवाट लावणार व वरीलप्रमाणे राडारोडा मनपा ने ठरवून दिलेल्या ठिकाणी टाकण्याची व्यवस्था करणार

16 मालकी हक्काबाबत व पुर्नवसनेचे योजनेमध्ये भाडेकरूंचा वाद निर्माण झाल्यास याची सर्व जबाबदारी विकसकाचीराहील व मनपास कोणतीही तोषीस लागू देणार नाही.

17 बाजूच्या अस्तित्वातील मिळकतीतील भाडेकरूंचे अस्तित्वातील हवा उजेडाचे इझमेंट राईटस जपणार.

18 बेसमेंटमध्ये साठणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी पंप बसवणार.

19 बेसमेंट पार्किंगचा वापर फक्त पार्किंगसाठीच करणार.

20 काम सुरू करण्यापुर्वी मान्यताप्राप्त दर्जाच्या परवानाधारक स्ट्रक्चरल डिझायनर/इंजिनियर यांची नेमणूक करणारे पत्र व जोते तपासणी दाखला तसेच कोणतेही भोगवटापत्र मागणेपूर्वी त्यांचे स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट/रिपोर्ट दाखल करणार. वाढीव बांधकाम स्ट्रक्चरल इंजिनिअरसंचे नियमित मार्गदर्शन व देखरेखीखाली पूर्ण करणार.

21 अस्तित्वातील जुनी बांधकाम पाडताना शेजारील मिळकत/मिळकतीतील इमारतीस धोका/नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणार.

22 नियोजित बांधकाम सुरू करणेपूर्वी रस्ता रुंदी सेटबॅक मधील तसेच अस्तित्वातील जुने बांधकाम पाडावयाचे दर्शविलेले बांधकाम वेध मार्गाने पाडणार.

23 विकास योजना/अग्निशामक दल यांचेकडील पत्रामधील अटी संबंधित मालक/विकसकावर बंधनकारक राहतील.

२४) कोणतेही जोते तपासणी दाखला मागणेपूर्वी एम.ओ.डी विभागाची एन.ओ.सी दाखल करणार

२५) प्रस्तावित नाल्याबाबत सुपरव्हीजन चार्जेस भरुन घेऊन नाल्या विकसनाचे काम पुणे मनपाच्या संबंधीत विभागाच्या देखरेखीखाली करुन घेणार व सदर विभागाचे ना हरकत पत्र दाखल करणार

0439 0001

# पुणे महानगरपालिका

(यापुढील पत्रव्यवहार खालील क्रमांक व दिनांक यांच्या उल्लेखासह करावा)

(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५.

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला (संमती नकाशासह)

## कमेन्समेन्ट सर्टिफिकेट

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४/४५/५८/६९ यांतील आणि महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट कलम २५३ मधील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

POONA MUNICIPAL CORPORATION BUILDING CONTROL DEPARTMENT APPROVED POONA

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण क्रमांक : | DNE/0039/12 | क्रमांक : | CC/0896/16 |
| Proposal Type : | Residential | दिनांक : | 11/7/2016 |
| Case Type : | New | | |
| Project Type : | Amalgamation + Proposed Building | | |

श्री./श्रीमती **MUKESH P GADA (PAH)** व्दारा ला.स.श्री. **SIDDHARTH S HARISCHANDRAKAR (CA/2004/34707)** यांस राहणार पुणे, पेठ **OFFICE NO-70,71,72, 4TH FLOOR PATIL ARCADE,KHIDARE ROAD,ERANDAVANA,PUNE** महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ चे कलमे ४४/४५/५८/६९ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ चे कलमे २५३/२५४ प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सीमेतील पेठ **DHANORI-EXT** घरांक सर्व्हे नं. 29 सि.सं.न - हिस्सा नं. **S NO 29(P) & 67/1B(P)** फायनल प्लॉट क्र. - प्लॉट क्र. - () (सोसायटी) येथे विकास करण्यासाठी आपण महानगरपालिकेकडे दिनांक **11/12/2012** रोजी प्रस्ताव दाखल केला आहे.

### -: अटी :-

१. सदरचा प्रस्तावातील दर्शविण्यात आलेली दर्शनी अंतरे / रस्ता प्रमाणरेषा पर्यंतचे क्षेत्र पुणे म.न.पा. च्या सुचनेनुसार भविष्यात सार्वजनिक रस्त्याचा भाग राहणार आहे.

२. कोणत्याही नवीन इमारतीचा अथवा वाढीव/तुरुस्त इमारतीचा वापर अथवा वापरासाठी परवानगी वा ताबा हा कोणत्याही व्यक्तिद्वारे पुणे म.न.पा. चे भोगवटापत्र प्राप्त झाल्याशिवाय करण्यात येऊ नये.

३. सदर संमतीपत्राची / विकास परवानगीची मुदत (काम सुरू झालेले नसल्यास) संमतीपत्राचे दिनांकापासून १ वर्षाची राहील. सोबतचा संमती नकाशा ह्या संमतीपत्रकाचा अविभाज्य भाग समजण्यात यावा.

४. सदर संमतीपत्र हे मुदत संपल्यानंतर प्रत्येक वर्षी नूतनीकरण करणे आवश्यक आहे, असे नूतनीकरण फक्त तीन वेळा करता येईल. तसे न झाल्यास महाराष्ट्र प्रदेशिक आणि नगरचा अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये नवीन अर्ज करून संमती घ्यावी लागेल. एम.आर.टी.पी. कलम ४८ अन्वये संमतीपत्राची वैधता राहील.

५. सदरचे संमतीपत्र हे पुढील अटींचा भंग झाल्यास रद्द करण्यास पात्र राहील.

(अ) जागेवरील विकसन/बांधकाम हे मान्य नकाशांप्रमाणे दर्शविलेल्या/संमती केलेल्या वापरानुसार होत नसल्यास अथवा सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम/अनधिकृत वापर चालू असल्यास अटींचा भंग समजण्यात येईल.

(आ) सदर बांधकाम प्रस्तावातील संदर्भातील नमूद केलेल्या अटींचे उल्लंघन होत असल्यास / झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास, पुणे म.न.पा. ने घातलेल्या निर्बंधाचे उल्लंघन झाले असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल.

(इ) अर्जदाराने सदरची परवानगी ही गैरकृत्य करून पुणे म.न.पा. चे दिशाभूल करून प्राप्त केलेली आहे, असे निदर्शनास असल्यास अटींचा भंग झाला आहे असे समजण्यात येईल. विकास नियंत्रण नियमावली, नियम क्र. ६.१०, महाराष्ट्र म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट कलम २५८ अन्वये सदरची परवानगी दिशाभूल करून घेण्यात आली असे समजण्यात येईल.

(ई) अर्जदार आणि जो इसम हा स्वतः किंवा त्यांच्याद्वारे मालकी हक्काचा दावा करून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४ व ४५ अन्वये असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून जमीन विकसन अथवा बांधकाम करत असल्याचे निदर्शनास आल्यास, सदरची परवानगी दिशभूल करून घेण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

६. सदर संमतीपत्रावरील/लगत असलेल्या अटी व सूचना या केवळ अर्जदारास नव्हे तर भविष्यातील अर्जदाराचे सर्व वालीवारस, मुखत्यारधारक, व्यवस्थापक, प्रशासक, वारसदार आणि प्रत्येक इसम जो अर्जदाराच्याद्वारा मालकी हक्क सिद्ध करील त्या सर्वांस कायमस्वरूपी बंधनकारक राहील.

७. काम सुरू करण्यापूर्वी एन. ए. ऑर्डर दाखल करणार.

८. अकृषिक दाखला (एन. ए. ऑर्डर), यु. एल. सी. आदेश, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळ, औद्योगिक संचलनालय, कामगार विमा आयुक्त यांचे आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

वरील संमतीप्रमाणे काम करताना महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोटनियम यांचा भंग होत आहे, असे पुणे म.न.पा. चे निदर्शनास आल्यास सदरचे संमतीपत्र रद्द करण्याचा अधिकार पुणे म.न.पा. राहील.

वरील संमतीपत्राविषयी काही शंका येत असेल तर कामास आरंभ करण्यापूर्वी महानगरपालिकेकडे तसे कळवून स्पष्टीकरण करून घ्यावे.

11/7/16

इमारत निरीक्षक
बांधकाम विकास विभाग
पुणे म.न.पा.

उप अभियंता
बांधकाम विकास विभाग
पुणे म.न.पा.

अटी पुढे चालू ....

-:अटी :-

1 भोगवटापत्रासाठी स्ट्रक्चरल इंजिनिअरचा दाखला (स्टॅबिलीटी सर्टीफीकेट) दाखल करणार.

2 अंशत: भोगवटापत्रासाठी रू. २२०/- चे स्टॅम्प पेपरवर इंडेम्निटी बॉन्ड दाखल करणे आवश्यक आहे.

3 भोगवटापत्र मागण्यापूर्वी पुणे महानगरपालिकेकडील कर आकारणी व करसंकलन पाणी पुरवठा, जलोत्सारण, पथ विभाग, अतिक्रमण इ. विभागाचे रक्कम व थकबाकी रक्कम पूर्णपणे भरणार.

4 कामगारांच्या सोयीसाठी जागेवर किमान एक संडास व एक मुतारी तात्पुरत्या स्वरूपाची बांधली पाहिजे. जुने संडास व मोरी असल्यास याप्रमाणे संडास, मुतारी बांधण्याची गरज नाही.

5 मालकी हक्काबाबत व इतर कोणत्याही हक्काबाबत व हद्दीबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार पूर्णपणे जबाबदार राहणार.

6 जे बांधकाम नकाशात पाडणार म्हणून दर्शविले आहे ते वैध मार्गाने पाडून त्यानंतरच नवीन कामास सुरूवात करणार.

7 बांधकाम विकास विभाग, खात्याने जरी सेप्टीक टॅन्कसाठी परवानगी दिली असली तरी कार्यकारी अभियंता(जलोत्सारण विभाग) यांच्याकडे नकाशे दाखल करून त्याची मंजूरी घेतल्याखेरीज सेप्टीक टॅन्क अगर ड्रेनेजसंबंधी बांधकाम सुरू करू नये व भोगवटा पत्र मागण्यापूर्वी ड्रेनेज कामाचे ड्रेनेज जोडासह नकाशे व दाखला हजर करण्यात यावा.

8 भोगवटापत्र मागणीचे अर्जापूर्वी मा. कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांचेकडील ड्रेनेज कनेक्शनचे मान्य नकाशे दाखल करणार.

9 इमारतीचे भोगवटापत्र देताना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचे अविशिष्ट सामान व राडारोडा उचलून जागा साफकेल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही. राडारोडा कोठे टाकावा याबाबत बांधकाम विकास विभागामार्फत मार्गदर्शन केले जाईल.

10 नवीन बांधकाम सुरु करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती वृक्ष प्राधीकरण समितीच्या पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

11 ज्या भूखंडावर नवीन इमारत बांधण्यात आली आहे त्या इमारतीचे भोगवटापत्र मागण्यापूर्वी प्रत्येक मालकाने इमारतीसभोवतीच्या भिंतींच्या आत व बाहेर उद्यान विभागाचे तरतुदीनुसार झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था व खबरदारी घ्यावी. त्याशिवाय (ऑक्युपन्सी सर्टिफिकेट) भोगवटापत्र मिळणार नाही.

12 सोबतच्या नकाशावर मागे लिहिलेल्या/चिटकवलेल्या अटींवर संमतीपत्र देण्यात येत आहे.

13 भूमीप्रापण कार्यालयामार्फत व/ बांधकाम विकास विभागाकडून रस्तारुंदी प्रमाणरेषा जागेवर आखून घेणार व मगच बांधकाम सुरु करणार या अटींवरच हे संमतीपत्र देण्यात येत आहे. (आवश्यक असल्यास)

14 जोत्यापर्यंत काम आल्यावर सेट-बॅक, मार्जिनल ओपन स्पेस इ. बाबी बांधकाम नियंत्रण कार्यालयाकडून तपासून घ्याव्यात, जोते तपासणी दाखला प्राप्त झाल्याशिवाय जोत्यावरील काम सुरू करू नये.

15 सोबतच्या नवीन/दुरूस्त नकाशात दाखविल्याप्रमाणे काम केले पाहिजे.

16 यापूर्वी अदा करण्यात आलेले विकसनाचे दाखले/संमतीपत्रे रद्द समजण्यात यावीत.

17 संबंधीत सुधारित विकास योजना आराखडा महाराष्ट्र सरकारने दि.०५/०१/१९८७, दि.०६/१२/२००७, दि.१८/०९/२००८, दि.०२/०३/२०१२, दि.०४/०४/२०१२ दिवशी मान्य केला आहे. त्यास अनुसरून नवीन काही उपसर्ग पोहोचत असल्यास अथवा हानी होत असल्यास त्याप्रित्यर्थ कोणत्याही प्रकारची भरपाई मागणार नाही व ती देण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर नाही.

18 इतर महत्वाचे अटी :

--------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------
-------------

19 मा.पर्यावरण विभागाकडील दि. १२ डिसेंबर २०१२ रोजीचे आदेशानुसार नमुद केलेप्रमाणे २०००० चौ.मी. पेक्षा जास्त एकुण बांधकाम क्षेत्र नियोजन प्रस्तावास मा. केंद्र शासन यांचेकडील पर्यावरण विभागाकडील नाहरकत पत्र घेणे बंधनकारक राहील. आवश्यक तेथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण बोर्डचे नाहरकत पत्र बांधकाम परवानगीचे वेळी दाखल करणे बंधनकारक राहील.

20 आवश्यकतेप्रमाणे लिफ्ट (उदवाहन)परवाना संबंधित प्राधिकारीकडून प्राप्त करून घेतले नंतरच वापर करणे बंधनकारक राहील.

21 बांधकाम जागेचा वापर सुरू करण्यापूर्वी भोगवटापत्र मागणेपूर्वी अग्निशामक विभागाकडील नाहरकत पत्र दाखला त्यानुसार

आवश्यक ती सर्व यंत्रणा जागेवर कार्यान्वित ठेवणार. सदर यंत्रणेची कायमस्वरूपी देखभाल/दुरूस्ती करून यंत्रणा नियमित ठेवणार.

22 विरळ वस्ती भागामध्ये भोगवटापत्र मागणीपूर्वी प्लॉट आबारात गांडूळ खत निर्मितीसाठी व्यवस्था करणार.

## काही महत्वाच्या विशेष सुचना

1 प्रकल्पाच्या सिमाभिंतीबाबत रिटेनिंग वॉल बाबत कार्यालयीन परिपत्रक क्रअन अ/ जा/ म आ/ ४८३ दि. ५/८/२०१३ च्या अटी बंधनकारक रहातील.

2 प्रकल्पामधील सर्व वापराच्या इमारतींमध्ये युरिनल व डब्ल्यूसी करिता ३ लि.(हाफफ्लश) आणि २. प्रकल्पामधील सर्व वापराच्या इमारती पाण्याचे नळ (बिब कॉक, बेसिन टॅप इ. नळ) ६लि.(फुल फ्लॅश) असे प्रकारचे फ्लॅश असे प्रकारचे फ्लश टँक यंत्रणा प्रत्येक ठिकाणी बसविणे व त्याप्रमाणे प्रति मिनिट इतक्या कमी दाबांचे पाण्याचे उपकरणे बसविणे. ३. प्रकल्पामधील जमिन पातळीपासून एकूण २४ मी. पेक्षा उंच इमारतीमध्ये पाण्याचा दाब व वहनाचा वेग नियंत्रित राहण्यासाठी दाब नियंत्रित व्हॉल्व्हस बसविणे. ४. प्रकल्पामधील सर्व वापराच्या इमारतीमध्ये प्रवासी उद्वाहना पारदर्शक अशा आगरोधक काचेच्या पट्या वापरलेला पारदर्शक दरवाजा व लिफटमध्ये सी.सी. टी.व्ही. कॅमेरा बसविणे.

3 भविष्यात मान्य नकाशा व्यतिरिक्त कोणतेही बांधकाम (उदा. सर्व मार्जिनल अंतरात व टेरेसवरील शेड, पार्टीशन वॉल करून अगर ग्रील लावून,

4 जुन्या अस्तित्वातील बांधकामाच्या कोपऱ्यावरील भिंतीचा भाग, कॉर्नर पार्ट रस्तारुंदी/सेटबॅक पडताळणीसाठी जोते तपासणी होणे पर्यंत राखून ठेवा व नंतर

5 व्यापारी वापराचे इमारतीचे दर्शनी भागातील ६.०० मी. सामासिक अंतरापैकी ३.० मी. रुंदीचे व्हिजीटर्स पार्किंगची रस्ता / फुटपाथ वरून अॅक्सेस् व्यवस्था

6 संरक्षक भिंतीचे प्रस्ताव मान्य करून घेऊनच बांधकाम पूर्ण करणार.

7 सदर प्रस्तावातील इमारतीचा वापर हा कायमस्वरूपी मान्य नकाशामध्ये दर्शविलेल्या वापरासाठीच करणार. सदरचे वापरात म.न.पा.च्या पूर्वपरवानगीशिवाय व

8 अस्तित्वातील जुनी बांधकाम पाडताना शेजारील मिळकत/मिळकतीतील इमारतीस धोका/नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणार.

9 सार्वजनिक वहिवाटीचे व समाईक वापराचे रस्ता/बोळ/प्रवेशमार्गाचे वहिवाटीबाबत वाद निर्माण झाल्यास अर्जदार जबाबदार राहतील.

10 भाडेकरू पुनर्वसन योजनेकरिताच्या अटी :- १) नविन इमारतीमध्ये जागा देण्याघेण्याबाबत एकमत झाले असल्याबाबत व त्याबाबत तक्रार नसल्याबाबत रजिस्टर करार जोते तपासणीपूर्वी दाखल करणार. २) कुलमुखत्यारपत्रधारक अगर मालक यांच्याकडून त्यांनी कबूल केल्याप्रमाणे जागेचा ताबा मिळाला/मिळणार आहे व त्याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे सर्वभाडेकरूंचे नोटराईज्ड ना हरकत पत्र, भोगवटापत्र मागणेपूर्वी दाखल करणार. ३) भाडेकरू व विकसक यांचे दरम्यान वाद निर्माण झाल्यास त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही ४) सुधारीत नकाशे दाखल करण्यापुर्वी पुणे म.न.पा.ने निर्धारीत केलेले नोटराईज्ड हमीपत्र करणार.

11 जागेवर अस्तित्वातील म.न.पा. मीटर कनेक्शन असल्यास काम सुरु करण्यापुर्वी पाणी पुरवठा विभागाचे ना हरकत पत्र दाखल करणार.

12 रस्तारुंदीचे अतिरिक्त पटई क्षेत्र वापरण्यापुर्वी सदर रस्त्याची जागा म.न.पा. च्या ताब्यात देणार.

13 कुठलेही वाढीव/दुरुस्त प्रस्ताव मान्यता मागणेपूर्वी सुधारित डी.पी.लेआऊट मान्य करून घेणार. (आवश्यकतेनुसार)

14 बांधकामाचे नकाशांना परवानगी मिळाल्याबर विकासकर्ता/मालक यांनी जागेवर फलक लावून खालील प्रमाणे माहिती दर्शवावी. अ) मालकाचे, विकसकाचे, ला. आर्कि. व कॉन्ट्रॅक्टर यांची नावे व पत्ता व संपर्क दुरध्वनी / भ्रमण दुरध्वनी क्रमांक.

15 काम सुरु करण्यापुर्वी मान्यताप्राप्त दर्जाच्या परवानाधारक स्ट्रक्चरल डिझायनर/इंजिनियर यांची नेमणूक करणारे पत्र व जोते तपासणी दाखला तसेच कोणतेही भोगवटापत्र मागणेपूर्वी त्यांचे स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट/रिपोर्ट दाखल करणार. वाढीव बांधकाम स्ट्रक्चरल इंजिनिअरर्सचे नियमित मार्गदर्शन व देखरेखीखाली पूर्ण करणार.

16 ओला व सुक्या कचऱ्याकरिता मिळकतीमध्ये कंटेनरची सोय करणार.

17 कमेन्समेंट सर्टिफिकेटचे दिनांकापासून १ (एक) वर्षाच्या आत अथवा कोणतेही भोगवटापत्र मागणीपूर्वी (जे अगोदर) एकत्रित/

स्वतंत्र असा ७/१२ उतारा व मोजणीचा सिटी सर्व्हे कडील नकाशा दाखल करणार.

18 विकास योजना खात्याकडील मान्य एकत्रीकरण/सब डिव्हीजन/लेआऊट ऑफ बिल्डींग मधील सर्व अटी बंधनकारक राहतील.

19 यु.एल.सी.ऑर्डरमधील सर्व अटी संबंधित मालक /विकसकावर बंधनकारक राहतील त्यास पुणे म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

विशेष अटी :-

1 सोलर सिस्टिमची यंत्रणा बसविणार.

2 जलसंवर्धनाकरिता नियोजित इमारतीमध्ये पर्जन्यजलाचे पुर्नभरण, दुहेरी फ्लश यंत्रणा, नियंत्रित दाब यंत्रणा

3 इमारतीतील उद्वाहनाचे (लिफ्टचे)दरवाजे लिफ्ट मधील स्थिती दिसण्याच्या दृष्टिने पारदर्शक असावेत.

4 हायराईज इमारतीचे सर्व्हिस/फायर ऑडिटिंग हे प्रत्येक वर्षी सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्याकडून करून घेणे बंधनकारक राहील. व म.न.पा. मागणीनुसार उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

5 मा. शासनाकडील शासन निर्णय क्र. टीपीएस-१८०७/२५२/सी.आर.६३०/०७/युडी-१३ मधील अतिरिक्त अग्निशमन व्यवस्था, विशेष वर्गवारीमधील स्ट्रक्चरल इंजिनिअर याची नेमणूक, सर्व्हिस व फायर लिफ्ट बाबाबत नमुद केलेल्या अटी बंधनकारक राहतील

6 हायराइज इमारती संदर्भातील वि.नि.नि.नियम क्र. २१.६.६ मधील तरतुदी बंधनकारक राहतील.

विषेश अटी :- १) कोणतेही जोते तपासणी दाखला मागणेपूर्वी एम.ओ.डी. विभागाची एन.ओ.सी. दाखल करणार.

२) प्रस्तावित नाल्याबाबत सुपरव्हीजन चार्जेस भरून घेऊन नाला विकसनाचे काम पुणे मनपाच्या संबंधित विभागाच्या देखरेखीखाली करून घेणार व सदर विभागाचे ना हरकत पत्र दाखल करणार

पुणे महानगरपालिका